Original Article
ISSN (Online): 2582-7472

ShodhKosh: Journal of Visual and Performing Arts
July 2024 5(7), 1701–1709

# ANALYTICAL EXERCISE FROM THE READERS' POINT OF VIEW REGARDING THE SERVICES AND FACILITIES PROVIDED TO THE READERS IN COLLEGE LIBRARIES" IN THE CONTEXT OF NAGPUR UNIVERSITY

## महाविद्यालयीन ग्रंथालयातून वाचकांना दिल्या जाणाऱ्या सेवा व सुविधांचा वाचकांच्या दृष्टिकोनातून विश्लेषणात्मक अभ्यास'' नागपूर विद्यापीठाच्या संदर्भात

Tushar S. Gedam [1], Vikas S. Borkar [2]

[1] Editor & Librarian, Blacksmith & Blacksmith, Dr. B.A. University, India
[2] Guide & Librarian, K.Z.S. University, Kalmeshwar, Bamhani, India

**DOI**
10.29121/shodhkosh.v5.i7.2024.6323

**Funding:** This research received no specific grant from any funding agency in the public, commercial, or not-for-profit sectors.

**Copyright:** © 2024 The Author(s). This work is licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.

With the license CC-BY, authors retain the copyright, allowing anyone to download, reuse, re-print, modify, distribute, and/or copy their contribution. The work must be properly attributed to its author.

## ABSTRACT

**English:** Sadar Abhyas Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur Vidyapeeth Nagpur attached aided Arts, Commerce and Science College's library has made efforts to provide analytical practice from the readers' point of view regarding the services and facilities provided. The college library makes every effort to improve the services and facilities of its library by the readers and for this, the college library is seen making efforts from time to time to improve its services and facilities.

**Hindi:** सदर अभ्यास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर संलग्नित अनुदानित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथालयातून दिल्या जाणाऱ्या सेवा व सुविधांचा वाचकांच्या दृष्टिकोनातून विश्लेषणात्मक अभ्यास केला गेल्याचे प्रयत्न केले आहे. महाविद्यालयीन ग्रंथालय आपल्या वाचकाला कोणकोणत्या सेवा व सुविधांचा वाचक किती उपयोग करित असून त्यासाठी महाविद्यालय ग्रंथालय वेळो—वेळी सेवा व सुविधा सुधारण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसते.

**Keywords:** College Library, Library Readers, Library Services and Facilities महाविद्यालय ग्रंथालय, ग्रंथालयीन वाचक, ग्रंथालयीन सेवा व सुविधा

## 1. प्रस्तावना

महाविद्यालयीन शिक्षण हे उच्च शिक्षण घेण्याचे स्थान असते त्यामुळे महाविद्यालयीन शिक्षण घेतांना वाचकाला त्याच्या सर्व क्षमता विकसित करण्यांत महाविद्यालय मदत करित असते. उच्च शिक्षणामुळे मुलभुत उद्दिष्ट प्राप्त करून इतरांची सेवा करण्याचे मोलाचे कार्य केले जाते.

महाविद्यालयीन शिक्षण घेतांना विदयार्थी वाचक आपले उद्दिष्टे आणि कार्य साध्य करण्यासाठी महाविद्यालयीन ग्रंथालय महत्वाची भुमिका निभाउ शकते कारण विदयार्थी जीवन घडवितांना त्यांना एकच विषयांची संपूर्ण माहितीची प्राप्ती करता—करता इतर विषयांना समजुन घेण्याची मदत जर कोणी करत असेल तर ते काम महाविद्यालयीन ग्रंथालय करित असते. त्यामुळे वाचकांना महाविद्यालयातील ग्रंथालय अति उपयोगी ठरत असते. ग्रंथालय हे एक उपयुक्त असे अभ्यासासाठी माध्यम बनले आहे. जे विदयार्थी वाचकाच्या

**How to cite this article (APA):** Gedam, T.S., and Borkar, V.S. (2024). Analytical Exercise from the Readers' Point of View Regarding the Services and Facilities Provided to the Readers in College Libraries" in the Context of Nagpur University. *ShodhKosh: Journal of Visual and Performing Arts, 5*(7), 1701–1709. doi: 10.29121/shodhkosh.v5.i7.2024.6323

शैक्षणिक प्रगतीसाठी महत्वाचे माध्यम बनले आहे. त्यामुळे महाविद्यालयातील ग्रंथालय ग्रंथालयीन वाचकांच्या बौध्दिक आणि सामाजिक विकासासाठी एक उपयुक्त असे साधन असल्याचे आज दिसून येत आहे. तसेच महाविद्यालयीन ग्रंथालय विदयार्थी वाचकांचे शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या आवश्यकतेसाठी परिपूर्ण मदत करित असते. तसेच संशोधनाला अधिक चालना देण्याचे कार्य करित असते. म्हणून असे कार्य महाविद्यालयीन ग्रंथालय करित असते आणि आपल्या वाचकाला विविध सेवा व सुविधा पूरवित असते. त्यामुळे अशा महाविद्यालयीन ग्रंथालयातून दिल्या जाणाऱ्या सेवा व सुविधांची माहिती जाणून घेणे उपयुक्त ठरेल.

**महाविद्यालय ग्रंथालय**

शालेय ग्रंथालयांत विद्यार्थ्यांना लागलेली स्वयंशिक्षणाची सवय पुढेही सूरू राहण्यासाठी व भविष्यांत ग्रंथ व ग्रंथालयाद्वारे आपला बौध्दिक विकास करण्यांसाठी विद्यार्थ्यांमध्ये असलेली वाचनाची आवड वाढविणे हे प्रमुख कार्य महाविद्यालयीन ग्रंथालयाचे असते.

महाविद्यालयीन शिक्षण घेणारा विदयार्थी वाचक तरूण असतो. त्यांना आपल्या जीवनांत यशस्वी होण्यासाठी आपले ध्येय व स्वप्ने प्रत्यक्षांत येण्यासाठी महाविद्यालयांत दिले जाणारे उच्च शिक्षण मोठया प्रमाणांवर सहाय्यभूत ठरते. तसेच अध्यापक विदयार्थ्यांना वर्गात शिकवितात परंतु वर्गात असणाऱ्या अधिक विदयार्थीसंख्येमुळे अध्यापकांना त्यांच्याकडे वैयक्तिक लक्ष देता येत नाही. अशा वेळेस विद्यार्थी अध्यापकांनी शिकवलेल्या विषयासंबंधी माहिती देणारी पुस्तके ही त्या महाविद्यालयांतील ग्रंथालयातुनच उपलब्ध होत असतात व त्यामुळे विदयार्थी वाचकांना अशा परिस्थीतीत महाविद्यालयीन ग्रंथालयांवरच अवलंबून रहावे लागते. यामुळे अशा वाचकांसाठी महाविद्यालयातील वाचकांना वर्गात शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमास पूरक असे वाचन साहित्य ग्रंथालयांत ठेवून विदयार्थी वाचकांना अप्रत्यक्ष मदत करित असते.

**महाविद्यालयीन ग्रंथालयातील विविध ग्रंथसंग्रह :—**

- अध्यापक व विदयार्थीसाठी क्रमिक पुस्तकाव्यतिरिक्त अधिक वाचनासाठी लागणारी ग्रंथ संग्रहीत केली जातात.
- ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रातील संदर्भ ग्रंथ, शब्दकोश, नियतकालीके, शासकीय प्रकाशने, नकाशे पुस्तीका व इतर साहित्यांचा संग्रह केला जातो.
- कथा, कादंबऱ्या, चरित्रे, प्रवासवर्णन इत्यादी प्रकारचे मनोरंजनात्मक वाचनसाहित्य महाविद्यालयीन ग्रंथालयात संग्रहीत असते.
- अध्यापनास व अध्ययनास पूरक ठरू शकतील अशा दृक श्राव्य साधने महाविद्यालयीन ग्रंथालयात संग्रहित केली जातात.

**उदा**. ऑडिओ—व्हिडीओ कॅसेट्स, सीडी, स्लाईड्स, टेप, ओएचपी इतर

**ग्रंथालयीन वाचक (उपयोजक) :—**

उपयोजक/वाचक म्हणजे असे सर्व महत्वाचे घटक/गुणधर्म ज्यांच्या शिवाय माहिती प्रणालीचा पूर्ण हेतूच नष्ट होईल. उपयोजन करने म्हणजे कोणत्यातरी हेतूने वापरने म्हणजे प्रणालीचा उपयोजक, प्रणालीच्या हेतुप्रमाणे त्यांचा उपयोग होतो.

भ्मसकप श्रनसपमद **यांनी उपयोजकाचे केलेले वर्गीकरण :—**

उपयोजक ही संज्ञा आहे, जी सर्वसाधारणपणे माहिती सेवेच्या आणि ग्रंथालयाच्या संदर्भात वापरली जाते आणि संशोधन अभ्यासासंदर्भात सहभागी प्रतिसादकांसाठी वापरली जाते.

**वाचकाविषयीचा अभ्यास :—**

ग्रंथालय हे संपूर्णत: वाचकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठीच असते. वाचक अभ्यास हा एखादया निर्मात्याने तो उत्पादित करण्याच्या उत्पादकांसाठी त्याच्या बाजाराचे सर्वेक्षण करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. उपयोजकाच्या म्हणजेच वाचकांच्या गरजा पूर्ण करणे हे ग्रंथालय व माहिती केंद्राचे काम आहे. त्यासाठी उपयोजकाच्या गरजा व स्वभावाचा अभ्यास करणे गरजेचे असते.

**ग्रंथालयीन सेवा व सुविधा :–**

महाविद्यालयीन ग्रंथालय हे आपल्या ग्रंथालयीन वाचकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक अशा सेवा व सुविधांची पूर्तता करण्यांसाठी वेळो–वेळी विविध सेवा व सुविधा आपल्या ग्रंथालयातुन देण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे अशा सेवा व सुविधा वाचकांना कितपत उपयोगी ठरत असतात. यांचा अभ्यास करने गरजेचे असल्यामुळे वाचकांना ग्रंथालयीन सेवा व सुविधे संदर्भात त्यांचे मत जाणून घेण्यासाठी सदर संशोधनाचे प्रयत्न केले गेले आहे.

**अभ्यासाचे मुख्य उद्दिष्टये :–**

१. ग्रंथालयीन सेवांचा वाचकांच्या दृष्टीकोनातून अभ्यास करणे.
२. महाविद्यालयीन वाचकांना ग्रंथालयाच्या किती फायदा होत आहे याचा आढावा घेणे.
३. महाविद्यालयातील ग्रंथालय वाचक सेवा व सुविधेबाबत समाधानी आहेत का याचा आढावा घेणे.
४. ग्रंथालयीन विविध सुविधेचा अभ्यास करणे.
५. वाचकांचा ग्रंथालयाला भेट देण्याचे उद्देश जाणून घेणे.

**व्याप्ती व मर्यादा :–**

या संशोधन अभ्यासाच्या माध्यमातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान अनुदानित महाविद्यालयाची निवड केली असून नागपूर विद्यापीठ संलग्नित असलेल्या नागपूर जिल्हा, वर्धा जिल्हा, भंडारा जिल्हा व नक्षलग्रस्त गोंदिया जिल्हयात असलेल्या अनुदानित महाविद्यालयाचा समावेश केला असून महाविद्यालयीन ग्रंथालयातील सेवा व सुविधा बाबत वाचकांचा दृष्टिकोन जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यासाची पध्दत :–**

सदर संशोधनाचा अभ्यास करण्यासाठी व माहिती संग्रहीत करण्यासाठी प्रश्नावली तंत्राचा वापर केला गेला असून त्याद्वारे माहिती प्राप्त केल्यावर त्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी विविध पध्दती व साधने वापरली आहेत. वर्णणात्मक पध्दतीचा वापर केला गेला आहे. त्यानूसार विविध महाविद्यालयांतील ग्रंथपाल व वाचकांना भेटून प्रश्नावली भरण्यांत आली असता त्यांच्या विषयासंबंधी सल्लामसलत करण्यांत आली आहे तसेच ज्या महाविद्यालयापर्यंत पोहचता आले नाही त्या महाविद्यालयांत पोष्टांच्याद्वारे प्रश्नावली पाठविण्यांत आल्या आहेत. त्यामध्ये स्वत:च्या पत्यासह पोष्टाच्या तिकीटाद्वारे संपूर्ण कार्य करण्याचे प्रयत्न केले आहे.

**माहितीचे विश्लेषण :–**


संशोधकाने वाचकांच्या सेवा व सुविधेसंदर्भात माहिती प्राप्त करण्यांसाठी एकूण ११७ महाविद्यालयांची निवड केली असता त्यांतील ९० महाविद्यालयांचा प्रतिसाद मिळाला असल्यास त्यातील विदयार्थी वाचक न्यादर्श प्रणाली (त्दकवउ ैउचसम) द्वारे १३५० वाचकांना प्रश्नावली देण्यांत आली असता १२६० वाचकांनी प्रश्नावलीला प्रतिसाद दिले असता त्याचे एकूण प्रमाण ९३.७७: होते. यानुसार

- महाविद्यालयीन ग्रंथालयांत येणाऱ्या स्त्री/पुरूष यांची संख्या दर्शविणारा तक्ता व आलेख क्र. (१) नुसार

**विदयार्थी वाचक स्त्री/पुरूष निहाय दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र | विदयार्थी वाचक लिंग | एकूण वाचक १२६० पैकी | शेकडा/प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पूरूष | ५४० | ४२.८५ |
| २ | स्त्री | ७२० | ५७.१५ |
| | एकूण – | १२६० | १००.०० |

**विदयार्थी वाचक स्त्री/पुरूष निहाय संख्या दर्शविणारा आलेख.**





वरिल तक्त्यांवरून व आलेखावरून गोळा केलेल्या माहितीवरून असे निदर्शनास येते की, संशोधकाने एकूण १२६० वाचकांची प्रश्नावली भरून घेतली असल्याचे विदयार्थी वाचकांचे लिंग प्रमाण ५४० पुरूष (४२.८५:) त्याचप्रमाणे स्त्री वाचकांचे प्रमाण ७२० (५७.१५:) होते असे दिसते.

- वाचक ग्रंथालयाला भेट/उपयोग केव्हा करतात याबाबत ग्रंथालयांतील वाचकांना ग्रंथालयाचा उपयोग/भेट घेतात याबाबत माहिती देण्याबाबत बोलले असल्यास त्यानुसार तक्ता व आलेख २ नुसार

**वाचक ग्रंथालयाचा उपयोग/भेट केव्हा करतात.**

| अ.क्र | ग्रंथालयाला भेट/उपयोग | एकूण वाचक १२६० | शेकडा/प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | दररोज | ६१९ | ४९.१५ |
| २ | आठवडयांतून एकदा | ३४७ | २७.५३ |
| ३ | महिण्यांतून एकदा | २१२ | १६.८२ |
| ४ | जेव्हा गरज पडते तेव्हा | ८२ | ०६.५० |
| | एकूण — | १२६० | १००.०० |

**आलेख**
**वाचक ग्रंथालयाचा उपयोग/भेट केव्हा करतात.**




वरील तक्ता व आलेखावरून असे निदर्शनास येते की, महाविद्यालयातील वाचक ग्रंथालयाचा केव्हा उपयोग करतात याविषयी त्यांना विचारले असता एकूण वाचकांपैकी ६१९ (४९.१५:) दररोज तर ३४७ (२७.५३:) आठवडयातून एकदा, २१२ (१६.८२:) महिण्यातून एकदा, ८२ (०६.५०:) वाचक जेव्हा गरज पडते तेव्हाच ग्रंथालयीन सेवा व सुविधांचा लाभ घेतात.

- ग्रंथालयाचा उपयोग करण्याची मुख्य कारणे जाणून घेण्यासाठी विचारले असता

**तक्ता व आलेख ३ नुसार**

| अ.क्र | उपयोग करण्याची मुख्य कारणे | एकूण वाचक | शेकडा/प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नियतकालीक वाचण्यासाठी | १२६ | १०.०० |
| २ | वर्तमानपत्र वाचण्यासाठी | ५०१ | ३९.७६ |
| ३ | ग्रंथासाठी | ४१७ | ३३.१० |
| ४ | इंटरनेट सेवा घेण्यासाठी | २१६ | १७.१५ |
| | एकूण — | १२६० | १००.०० |

**आलेख**
**ग्रंथालयाचा उपयोग करण्याची मुख्य कारणे जाणून घेण्यासाठी**





वरिल तक्ता व आलेखावरून असे निदर्शनास येते की, एकूण १२६० वाचकांपैकी ग्रंथालयाचा उपयोग करणारे वाचक १२६ (१०.१०:) नियतकालीके, ५०१ (३३.१०:) वर्तमानपत्रे, २१६ (१७.१४:) इंटरनेट सेवा घेण्यासाठी तसेच ४१७ (३३.१०:) ग्रंथासाठी याप्रमाणे ग्रंथालयाचा उपयोग करतांना निदर्शनास आले.

- वाचकांना ग्रंथालयातील वाचन साहित्य व संसाधनाबाबत विचारले असता

**तक्ता व आलेख ४ नुसार**

| अ.क्र | ग्रंथालयात उपलब्ध साहित्य व संसाधने | एकूण महाविद्यालयाची वाचक संख्या | शेकडा/प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १०७३ | ८५.१६ |
| २ | नाही | १८७ | १४.८४ |
| | एकूण — | १२६० | १००.०० |

**आलेख**





वरिल तक्ता आणि आलेखावरून वाचकांना ग्रंथालयांत वाचन साहित्य आणि संसाधनाविषयी माहिती घेतली असता एकूण वाचकांपैकी १०७३ (८५.१६:) वाचकांनी साहित्य आणि संसाधने उपलब्ध असल्याचे तर १८७ (१४.८४:) वाचकांनी साहित्य आणि संसाधने उपलब्ध नाही असे नमुद केल्याचे दिसते.

- नवीन येणारे वाचन साहित्याचे सुचना फलकावर माहिती मिळते काय याबाबत माहिती घेतली असता

**तक्ता व आलेख क्र. ५ नुसार**

| अ.क्र | नवीन येणारे वाचन साहित्याचा तपशिल | एकूण वाचक | शेकडा/प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४१५ | ३२.९५ |
| २ | नाही | ५४ | ०४.२७ |
| ३ | काही वेळा | ७९१ | ६२.७९ |
| | एकूण — | १२६० | १००.०० |


**आलेख**




वरिल तक्ता व आलेखावरून असे निदर्शनास येते की, एकूण १२६० वाचकांपैकी ४१५ (३२.९४:) वाचकांना नवीन येणारे वाचन साहित्याची माहिती सुचना फलकावर मिळत असल्याचे निदर्शनास येते तर ५४ (०४.२७:) वाचकांनी नाही म्हटले तर ७९१ (६२.७९:) वाचकांनी काही वेळा सुचना फलकांवर माहिती मिळत असल्या बाबत माहिती देतांना सांगितले.

- ग्रंथालयांत पारंपारिक सेवा संबंधी माहिती जाणून घेण्यासाठी माहिती विचारली असता


**तक्ता व आलेख क्र. ६ नुसार**




वरिल तक्ता व आलेखावरून असे निदर्शनास येते की, महाविद्यालयीन ग्रंथालयात वाचकांना विविध पारंपारिक सेवा देण्यांत येतात असे निदर्शनास येते त्यानुसार देव—घेव सेवा १२६० (१००:), महाविद्यालयात वाचकांना देण्यांत येते तर संदर्भ सेवा ८३८ (६६.५०:), वाचन साहित्य सुची सेवा ६९३ (५५.००:), वर्तमानपत्र सेवा १२६० (१००:), वृत्तपत्र कात्रण सेवा १०२० (८०.००:), तर बहि:शाल सेवा ६३४ (५०.३१:) याप्रमाणे ग्रंथालयीन वाचकांना देण्यांत येते. असे निदर्शनास आले.

- वाचकांना ग्रंथालयात संगणक सेवाबाबत तपशिल विचारले असता

**तक्ता व आलेख क्र. ७ नुसार**




वरिल तक्ता व आलेखावरून असे निदर्शनास येते की, ग्रंथालयीन वाचकांना ग्रंथालयातून विविध प्रकारच्या संगणक सेवा देण्यांत येतात. त्यापैकी एकूण वाचकांपैकी प्रत्येक महाविद्यालयातील वाचकांनी इंटरनेट सेवा १२६० (१००:) मिळाल्याचे माहिती सांगितली. तर इतर वाचकांनी ई—मेल सेवा ४९० (३८.८८:), ओपेक सेवा ९३० (७३.८०:), ऑनलाईन डाटाबेस सेवा ७८४ (६२.२२:), ऑफलाईन डाटाबेस सेवा ५४९ (४३.५७:), प्रलेख प्रदान सेवा ३५५ (२८.१७:), तसेच वाय—फाय सेवा ४९० (३८. ८८:) महाविद्यालयातून देण्यांत येते असे निदर्शनास आले.

- वाचकांना भौतीक सुविधेबाबत माहिती जाणून घेण्यासाठी विचारले असता

**तक्ता क्र. ८ नुसार**


| अ. क्र. | ग्रंथालयीन भौतिक सुविधा | एकूण १२६० पैकी वाचक प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ग्रंथालयीन जागा | १०१७ | ८०.७१ |
| २ | ग्रंथालयीन स्वच्छता | ११०३ | ८७.५३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | फर्निचर-खुर्च्या | ९७६ | ७७.४६ |
| ४ | फर्निचर-टेबल | १०२९ | ८१.६६ |
| ५ | ग्रंथालयीन पंखे | १०१३ | ८०.३९ |
| ६ | प्रकाश योजना | ११०३ | ८७.५३ |
| ७ | स्वच्छता गृह | ९८८ | ७८.४१ |
| ८ | पिण्याचे पाणि | १०१९ | ८०.८७ |
| ९ | वाचन कक्षाच्या क्षमता | ८८७ | ७०.३९ |
| १० | आवाज/ग्रंथालय शांतता | ९३० | ७३.८० |
| ११ | खेळती हवा | ११२५ | ८९.२८ |
| १२ | फलोरिंग | ९१० | ७२.२२ |
| १३ | अंतर्गत मांडणी | ७९५ | ६३.०९ |
| १४ | सुचना व मार्गदर्शक फलक | ६९७ | ५५.३१ |

वरिल तक्त्यानूसार एकूण महाविद्यालयातील वाचकांना प्रश्नावलीद्वारे भौतिक सुविधेबद्दल विचारले असता त्यांनी त्यांच्या महाविद्यालयीन ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधेबद्दल समाधान कारक नोंद केल्याचे निदर्शनात आले.

- ग्रंथालयाच्या एकूण कार्याबाबत समाधानाविषयी विचारले असता

| अ. क्र. | एकूण कार्याबद्दल समाधानी | ग्रंथालयांतील एकूण वाचक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ८३३ | ६६.११ |
| २ | नाही | १२० | ०९.५२ |
| ३ | काही प्रमाणांत | ३०७ | २४.३७ |
| | एकूण - | १२६० | १००.०० |




**ग्रंथालयाच्या एकूण कार्याबाबत समाधान दर्शविणारा तक्ता व आलेख**

वरिल तक्ता व आलेखावरून प्रश्नावलीद्वारे ग्रंथालयीन कार्याबाबत प्रश्न विचारले असता त्यांनी ग्रंथालयीन कार्याबाबत समाधानी असल्याचे ८३३ (६६.११:) तसेच समाधानी नसल्याचे १२० (०९.५२:) व ३०७ (२४.३७:) वाचक हे ग्रंथालयीन कार्याबाबत काही प्रमाणात समाधानी असल्याचे असे निदर्शनास येते.

**निष्कर्ष**

अभ्यासातून संशोधकांना असे दिसून आले की, महाविद्यालयातील विदयार्थी वाचक मग तो पुरूष असो किंवा स्त्री असो या दोघांनाही महाविद्यालयीन ग्रंथालये भेदभाव न करता लाभ देतांना दिसून आले. तसेच वाचक ग्रंथालयांत फक्त नियतकालीक, वर्तमानपत्र किंवा इंटरनेटचा वापर करण्यासाठी येत असतात. काही प्रमाणांत नवीन येणाऱ्या ग्रंथाची माहिती पाहण्यासाठी येतांना दिसतात. ग्रंथालयांत पारंपारिक सेवेसोबतच आधूनिक सेवाही देतांना दिसतात. व ग्रंथालयीन एकूण भौतिक सुविधेसंदर्भात समाधानी असल्याचे निदर्शनास येते. तर ग्रंथालयाच्या एकूण कार्याबाबत बरेच वाचक समाधानी असल्याचे निष्कर्षाअंती समजले.

**शिफारशी**

इंटरनेटवर आधारित सुविधा जास्त प्रमाणांत करावी. वाचकांना उन्हाळयांत कुलिंग सिस्टमची सुविधा तसेच थंड पिण्याचे पाण्याची सोय करावी. ग्रंथालयातील विविध सेवा व सुविधा काळानुरूप बदल करण्यांत यावे असे वाटते. आधूनिकतेची जोड धरून ई—संसाधनाचा वापर करून वाचकांना आधूनिक स्वरूपाच्या सेवा देण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले पाहिजे. तेव्हाच आजचे वाचक सुशिक्षीत होण्यास मदत होईल.

## संदर्भ

लेले, वसंत ग्रंथालय आणि उपयोजक (2013) युनिव्हर्सल प्रकाशन.

निकोसे, सत्यप्रकाश, संशोधक पध्दती (2000) प्रज्ञा प्रकाशन, नागपूर.

जैन, प्रकाश आणि मंगला हिरवाडे (2011—12) सुलभ माहिती तंत्रज्ञान, विश्व पब्लिशर्स, नागपूर.

जैन, प्रकाश आणि प्रमोद, डाखोळे व इतर (2006) सुलभ ग्रंथालयशास्त्र, विश्व पब्लिशर्स, नागपूर.